दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.२० सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ३५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 20 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 35 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

## मंत्र्यांनी विदर्भात केवळ पर्यटनासाठी येवू नये:जबाबदारीने काम करा-प्रफुल्ल पटेल यांचे राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना खडेबोल

**नागपूर (वृत्तसंस्था)**–सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांनी विदर्भात केवळ पर्यटनासाठी येऊ नये, असे खडेबोल राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी शुक्रवारी येथे आयोजित राष्ट्रवादीच्या चिंतन शिबिरात सुनावले. दोन तासांसाठी येवून, फक्त तोंड दाखवून मुंबईला दादांकडे किंवा तटकरेंकडे हजेरी लावून सांगायचे की मी या जिल्ह्यात जावून आलो. त्याला काहीही अर्थ नाही. दोन तासांच्या पर्यटनासाठी आमच्याकडे येवू नका, असे ते म्हणाले.विदर्भातील सहकाऱ्यांना मदत कशी होईल, त्याला ताकद कशी मिळेल याचा विचार करून याच्यासाठी यायचे असेल तरच या. बुलढाणा, वाशिम, गोंदियाला पालकमंत्री दिलेले आहेत. आपण संपर्क मंत्रीही दिलेत. या सगळ्यांना जबाबदारी द्यायला पाहिजे. पालकमंत्र्यांनी केवळ १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व १ मे महाराष्ट्र दिनी झेंडा वंदन करण्यासाठी येवू नये. झेंडावंदन जिल्हाधिकाऱ्यांनी केले तरी चालेल. पण, राष्ट्रवादीच्या पालकमंत्र्याने खऱ्या अर्थाने पालकमंत्र्याच्या भूमिकेतून यायला पाहिजे, असे प्रफुल्ल पटेल म्हणाले.

राष्ट्रवादीच्या प्रत्येक पालकमंत्र्यांना जबाबदारी देण्याची गरज आहे. त्यांना संबंधित जिल्ह्यात जात असताना मधल्या जिल्ह्यातही दोन चार तास थांबून तेथील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना मदत केली पाहिजे, असे ते म्हणाले.महाविकास आघाडीत काँग्रेस मोठा भाऊ असल्याने कमी जागा मिळत होत्या. आत्ता महायुतीत भाजपा मोठा पक्ष आहे. येथेही आपल्या वाट्याला कमी जागा आल्या. पण, विधानसभेत सहा जागा थेट लढवल्या आणि जिंकल्या, हे मोठे यश आहे, असा दावाही प्रफुल्ल पटेल यांनी यावेळी केला. अलीकडच्या काळात झपाट्याने शहरीकरण वाढले आहे. निम्यापेक्षा जास्त मतदारसंघ शहरी भागात आहेत. या भागाचे प्रश्न वेगळे आहेत. त्याचाही विचार केला पाहिजे, असे पटेल यांनी सांगितले.



## आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाकडून तळोदा येथे रास्ता रोको आंदोलन

**नंदुरबार । दिपक गोसावी**

मराठा आणि बंजारा समाजाला कुणबी नोंदीच्या आधारे आदिवासी आरक्षण देण्याच्या राज्य सरकारच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच, नंदुरबार जिल्हा कमिटीच्या वतीने तळोदा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदार व पोलिस निरीक्षकांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.




निवेदनात म्हटले आहे की, सध्या राज्यात काही जातीयवादी शक्ती समाजा-समाजात तेढ निर्माण करत आहेत. निजामकालीन हैद्राबाद गॅझेटनुसार मराठा समाजाला कुणबी आरक्षण देण्याची घोषणा राज्य सरकारने केली आहे. त्याच गॅझेटनुसार बंजारा समाजालाही आदिवासी आरक्षण देण्याची मागणी केली जात आहे, ज्याला मराठवाड्यातील काही आमदार आणि मंत्री पाठिंबा देत आहेत. हे पूर्णपणे असंविधानिक आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानानुसार प्रत्येक वंचित आणि मागास समाजाला लोकसंख्येनुसार आरक्षण दिले आहे. हैद्राबाद गॅझेटमध्ये बंजारा समाज आदिवासी नसून एक महत्त्वाची शेतकरी जात असल्याचा उल्लेख आहे. त्यांचे राहणीमान, चालीरिती, परंपरा, संस्कृती आणि पेहराव आदिवासी समाजापेक्षा भिन्न आहेत.यावेळी मंचाने विविध मागण्या केल्या. बंजारा आणि धनगर समाजाला आदिवासी आरक्षणात समाविष्ट करू नये, खोटे जात प्रमाणपत्र बनवून शासकीय सवलती घेणाऱ्यांवर कारवाई करावी, पेसा क्षेत्रात पेसा भरती लागू करून कायमस्वरूपी नोकरी द्यावी, आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करणारे जनसुरक्षा विधेयक रद्द करावे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.तसेच, नंदुरबार येथील जय वळवी या आदिवासी तरुणावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यातील संशयित आरोपी सूर्यकांत सुधाकर मराठे आणि चेतन चौधरी यांच्यावर कठोर कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणीही करण्यात आली. तसेच, रिल्सच्या माध्यमातून आदिवासी समाजाबद्दल अपशब्द वापरणाऱ्या लोकांवर ट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणीही करण्यात आली.

आंदोलकांनी रोजगार हमी योजनेचे दीड वर्षापासून थकीत असलेले कुशल पेमेंट आणि घरकुलाचे पेमेंट तात्काळ अदा करण्याची मागणीही केली. बंजारा समाजाला आदिवासी समाजाचे आरक्षण लागू केल्यास राज्यात तीव्र चक्काजाम आंदोलने केली जातील, असा इशाराही आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाने दिला.

या आंदोलनामध्ये कॉम्रेड अनिल ठाकरे, कॉम्रेड सुनील गायकवाड, कॉम्रेड दयानंद चव्हाण, कॉम्रेड शामसिंग पाडवी, कॉम्रेड रुबाबसिंग ठाकरे, कॉम्रेड धरमराज ठाकरे, कॉम्रेड संदीप वळवी, कॉम्रेड विकास ठाकरे, कॉम्रेड राजकिरण पाडवी, कॉम्रेड अर्जुन ठाकरे, कॉम्रेड बहादूर पाडवी, कॉम्रेड अजय ठाकरे, कॉम्रेड पांडुरंग नाईक, कॉम्रेड सुपड्या ठाकरे, कॉम्रेड सोमनाथ ठाकरे, कॉम्रेड पावबा ठाकरे, कॉम्रेड सतीश पाडवी, कॉम्रेड सुखदेव ठाकरे, कॉम्रेड सुधाकर ठाकरे, आणि कॉम्रेड नवनाथ ठाकरे या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.

## अवैध दारूची वाहतूक करणाऱ्या वाहनाला पकडण्यात शहादा पोलिसांना यश

### ८४ लाख १२ हजार रुपयांची दारू आणि वाहन जप्त

**नंदुरबार । दिपक गोसावी**

दि. १९ सप्टेंबर, २०२५ रोजी शहादा पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, त्यांनी दोंडाईचा-सारंगखेडा मार्गावरून एका लाल रंगाच्या अशोक लेलँड कंपनीच्या कंटेनर ट्रकमधून होणारी अवैध दारूची वाहतूक पकडली. या कारवाईत ६९,१२,००० रुपयांची दारू आणि १५,००,००० रुपयांचे वाहन जप्त करण्यात आले.शहादा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश देसले यांना मिळालेल्या माहितीनुसार, दोंडाईचा-सारंगखेडा मार्गे विदेशी दारूची चोरटी वाहतूक होणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यावर, त्यांनी डी.बी. पथकाला कारवाईसाठी रवाना केले.

या माहितीच्या आधारे, डी.बी. पथक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक भुनेश मराठे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शहादा-दोंडाईचा रोडवरील संविधान चौकात नाकाबंदी केली.

नाकाबंदीदरम्यान, केए. ०९ एबी ०४८४ क्रमांकाचा एक लाल रंगाचा अशोक लेलँड ट्रक येताना दिसला. त्याला थांबवून चौकशी केली असता, चालकाने त्याचे नाव सुरेश भगीरथराम बिश्नोई (वय २३, रा. अजानीयोकी ढाणी, घोरीमना, जि. बाडमेर, राजस्थान) असे सांगितले. तो गोंधळल्याचे पाहून पोलिसांना संशय आला.

पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता, त्यात एकूण १,२०० दारूचे बॉक्स आढळून आले, ज्यांची किंमत सुमारे ६९,१३,००० रुपये आहे.



दारूच्या बॉक्ससह १५,००,००० रुपये किमतीचे वाहनही जप्त करण्यात आले. आरोपी सुरेश बिश्नोई विरोधात शहादा पोलीस ठाण्यात भा.न्या. संहिता कलम १२३सह महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई १०८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यामध्ये शहादा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश देसले, डी.बी. पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक भुनेश मराठे, पोलीस हेडकॉन्स्टेबल दत्ता बागल, जितेंद्र सुर्यवंशी, आणि पोलीस कॉन्स्टेबल विक्की शिंपी यांनी ही कारवाई यशस्वी केली.

## तळवे ग्रामपंचायतीत 'समृद्ध पंचायत राज अभियानाची' स्वच्छतेने सुरुवात; ग्रामविकासासाठी 'पंचायत बंधू' नेमले

**नंदुरबार । दिपक गोसावी**

ग्रामविकासाची कास धरत तळवे ग्रामपंचायतीने एक अभिनव आणि महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी 'पंचायत बंधू' या स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली आहे. या ऐतिहासिक निर्णयाने मुख्यमंत्री 'समृद्ध पंचायत राज अभियानाची' गावात उत्साहात सुरुवात झाली आहे. या उपक्रमात पहिल्या टप्प्यात गाव स्वच्छतेवर भर देण्यात आला असून, गावातील विविध सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.या स्वच्छता मोहिमेत ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी केंद्र, उपकेंद्र आणि माध्यमिक विद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून गावातील सार्वजनिक जागांचे स्वरूप बदलण्याचा आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.यावेळी



लोकनियुक्त सरपंच मोग्या भील, ग्रामविकास अधिकारी सुवर्णा वळवी यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, जि.प. व माध्यमिक विद्यालयातील शिक्षक आणि अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सक्रिय सहभागाने ही मोहीम यशस्वी झाली.गावाच्या विकासासाठी पुढील काळात विविध उपक्रम राबवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने 'प्लास्टिक मुक्ती अभियान' राबविणे, गावातील प्रमुख रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण व त्यांची देखभाल करणे, कर वसुलीबाबत जनजागृती करणे, तसेच नियमित श्रमदानातून ग्रामस्वच्छता करणे यावर भर दिला जाईल. याशिवाय, गावात आरोग्य तपासणी आणि आरोग्य जनजागृती शिबिरांचे देखील आयोजन केले जाणार आहे. या उपक्रमामुळे गावात स्वच्छतेबरोबरच पर्यावरणपूरक आणि सर्वांगीण विकास साधला जाईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. 'पंचायत बंधू' ही संकल्पना गावाच्या विकासासाठी एक नवा आदर्श निर्माण करेल, अशी अपेक्षा आहे.

## परळी येथे सप्तशृंगी दुर्गाउत्सव मंडळाची कार्यकारिणी जाहीर

**परळी । प्रतिनिधी**

भव्य आसा आकर्षक देखावा सादर करण्यात येणार असून या मध्ये सर्व धर्म समभाव चे देखावे व गुफा सादर करण्यात येणार आहेत लहान मुलांन पासून मोठ्या व्यक्ती पर्यंत सर्वांना पाहण्यासाठी आकर्षक असा देखावा होणार आहे

प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी परळी शहराच्या धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रसिद्ध असणार्या गणेशपार विभागातील सप्तशृंगी दुर्गाउत्सव मंडळ २०२५ ची कार्यकारनी विशाल भैया देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व परळी नगरीचे माजी नगरअध्यक्ष तथा सप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक नाना देशमुख यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व माऊली चिकने,

केशवराव जाधव, राजाभाऊ बारगजे, विजय पुजारी, विजय माळी, बालाजी घोडके, उत्तम मोरे, आबासाहेब देशमुख, प्रकाश चाचा देशमुख, अरुण तापके, राम लोखंडे, नितीन चव्हाण दत्ता काळे, बालाजी अनंतपुरे, पेंटर अनिल, जगन्नाथ सुरवसे, दीपक पूरभय्ये, राजू पूरभय्ये, अनंत देशमुख, पांडू सुरवसे, ओम दादा देशमुख सतीश सानप, मुकुंद देशमुख, सुनील देशमुख, अॅड. अर्जुन सोळंके प्रदीप देशमुख, नीलेश देशमुख अरविंद देशमुख या सर्वांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये चिठ्ठी काढून लहान मुलांच्या हस्ते चिठ्ठी द्वारे खालील प्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली



अध्यक्ष दत्तात्रय तुरुप,उपाध्यक्ष, शुभम मुंडे, लखन ठाकूर,सचिव संग्राम पवार

सहसचिव सौदागर शेळके, कोषाध्यक्ष तेजस देशमुख,

सहकोषअध्यक्ष गोविंद चाटे, कार्यअध्यक्ष भैय्या मस्के,

सजावट प्रमुख संदीप देशमुख, प्रसिद्धी प्रमुख तुकाराम चाटे, गणेश पुजारी वरील सर्व पदाधिकारी यांचे दीपक देशमुख यांनी अभिनंदन केले.

## धडगावमध्ये जुन्या वादातून खूनी संघर्ष, एकाचा मृत्यू; २४ आरोपींविरोधात गुन्हा दाखल

**मोलगी । रवींद्र वळवी**

नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यात एका जुन्या वादातून झालेल्या हाणामारीत एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी या प्रकरणी एकूण २४ आरोपींविरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला असून, त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. काय आहे प्रकरण? हे प्रकरण १६ सप्टेंबर रोजी सकाळी ८.१५ च्या सुमारास धडगाव येथील तेलखेडी शेलबारपाडा गावात घडले. या प्रकरणातील मुख्य आरोपी दिनेश कुरशा पावरा याच्या आईवर फिर्यादीच्या भावाने बलात्कार केल्याचा जुना राग मनात धरून हा हल्ला करण्यात आला. आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून पोड्या बुवटा पावरा (वय ५१) या व्यक्तीवर लाकडी मुसळ, काठ्या आणि दगडांनी हल्ला केला. या हल्ल्यात पोड्या बुवटा पावरा यांचा जागीच मृत्यू झाला. अनेक जण जखमी या हल्ल्यात फिर्यादी मनिल पोड्या पावरा यांच्यासह भाईदास पोड्या पावरा, अनिल पोट्या पावरा, कोटा बोठ्या पावरा आणि जिनीबाई बटेसिंग पावरा हे देखील गंभीर जखमी झाले. आरोपींनी त्यांना जिवे ठार मारण्याची धमकीही दिली. जखमींना तात्काळ धडगाव ग्रामीण रुग्णालय आणि नंतर पुढील उपचारासाठी नंदुरबार जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांची कारवाई या घटनेची माहिती मिळताच धडगाव पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलीस निरीक्षक राजेंद्र एच. जगताप यांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे. पोलिसांनी हल्ल्यासाठी वापरलेले लाकडी दांडके आणि दगड जप्त केले आहेत. सर्व २४ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्या अटकेची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. सध्या गावात शांतता असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



## संपादकीय

# हजार कोटींचा निष्काळजीपणा



अकरा वर्षांपूर्वी मुंबईत मोनोरेल धावू लागली, तेव्हा सगळ्यांनी 'मोना डार्लिंग' म्हणून तिचं मोठं प्रेमभर कौतुक केलं होतं. अकरा वर्षांनंतर आता या 'मोना डार्लिंग'चे रंग उडाले असून ज्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे या मोनोरेलची जबाबदारी होती, त्यांनी गळ्यात मारल्यासारखी तिला अकरा वर्षं चालवली खरी, पण या क्षेत्रातील नवतंत्रज्ञान आणि आपल्याकडील पूर्वीचं तंत्रज्ञान याचा मेळ घालण्यासाठी जे करायला हवं होतं, ते केलं नाही हे आता उघड होऊ लागलं आहे. जी सेवा निर्माण केली, तिची योग्य काळजीही घ्यायला हवी, आपल्या सेवेची विश्वासार्हता वाढवत न्यायला हवी हे या प्राधिकरणाच्या गावीही नसल्याने तुरळक प्रवासी वाहून येणाऱ्या या मोनोरेलकडे सर्वार्थाने दुर्लक्ष झालं आहे. परिणामी त्यात वारंवार बिघाड आणि अपघात होऊ लागले आहेत. प्रत्येक बिघाड आणि अपघातावेळी कोणाला तरी 'बळीचा बकरा' बनवून वेळ मारून नेता येते, पण, तसेच प्रकार वारंवार घडू लागले, तर असे किती 'बकरे' करणार? कितींना निलंबित करणार? असे प्रश्न उपस्थित होणारच. त्यातून कारवाईच्या प्रामाणिकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होतात, हे लक्षात घ्यायला हवं. या मातब्बर प्राधिकरणाच्या अशा जागा दिवसेंदिवस अधिकाधिक उघड्या पडू लागल्या आहेत. गेल्या पाच वर्षांत प्राधिकरणाकडून सुरू असलेल्या विकासकामांत झालेल्या निष्काळजीपणाच्या याद्या केल्या, तर त्या बऱ्याच लांबलचक होतील. पायाभूत विकासासाठी सरकारकडून दिलं जात असलेलं प्राधान्य, त्यासाठी उपलब्ध करून दिला जात असलेला निधी आणि संबंधित वरिष्ठांना दिलं गेलेलं पूर्ण स्वातंत्र्य पाहता सरकार आणि जनतेची या प्राधिकरणाकडून विशेष अपेक्षा आहे. महामुंबईचं भवितव्य या प्राधिकरणाच्या हाती आहे. प्राधिकरणाचा कोणताही प्रकल्प काही हजार कोटींचाच असतो. मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्र्यांसारख्या अतिवरिष्ठ उच्चपदस्थांकडे त्याचं नेतृत्व असतं. अशा प्राधिकरणात दूरदृष्टीचा भाव असेल किंवा तांत्रिक बाबीही गांभीर्याने पाहिल्या जात नसतील, सुरक्षा यंत्रणेवर मोठा खर्च होऊनही केवळ अव्यवस्थापनामुळे अनावस्था प्रसंग उद्भवत असतील, तर ही बाब निश्चितच गंभीर आहे. तिचा वरिष्ठ पातळीवर विचार झाल्याशिवाय राहणार नाही.मुंबईकर एकतर मोनोरेलच्या वाट्याला जात नव्हते. वार्षिक २२० कोटी रुपयांचा तोटा करणारी ही मोनोरेल पावसाळ्याच्या काळात तातडीची पर्यायी व्यवस्था म्हणून वापरली जाऊ लागली. नेमक्या त्याच वेळी बिघाड आणि अपघातांची मालिका सुरू झाली. पूर्ण देशात मनोरेल फक्त मुंबईत आहे. गेल्या महिन्याभरात या छोट्याशा मार्गिकेवरील मोनोरेलमध्ये तीन वेळा बिघाड झाले आहेत. ऑगस्ट महिन्यात ज्या ठिकाणी ३०० प्रवाशांची काचा फोडून सुटका करावी लागली, त्याच ठिकाणी सोमवारी हा बिघाड झाला. वीज पुरवठा खंडित झाल्याने आपत्कालीन परिस्थिती उद्भवली असं सांगितलं जात आहे. आपत्कालीन परिस्थिती उद्भवण्याचं नेमकं कारण आज-उद्या उघड होईल; पण यावेळीही १७ प्रवाशांची कठीण प्रसंगातून सुटका करावी लागली, ही वस्तुस्थिती आहेच. प्राधिकरणाकडे एकूण आठ मोनोरेल होत्या. ऑगस्टमधील अपघातामुळे त्यातली एक मोनोरेल बाद झाली. उरलेल्या सातही गाड्या अकरा वर्षे वापरात आहेत. त्या जुन्या झाल्या आहेत. त्यांच्या तक्रारी सुरू होणार, तांत्रिक बिघाड होणार याची कल्पना प्राधिकरणालाही असल्याने त्यांनी तीनेक वर्षांपूर्वीच नव्या गाड्या खरेदी करण्याचा निर्णय घेतला. यावेळी मलेशियातल्या कंपनीला कंत्राट न देता स्वदेशी कंपनीला कंत्राट दिलं गेलं. दहापैकी सहा नव्या मोनोरेल दीड वर्षांपूर्वीच येऊन दाखलही झाल्या. पण या नव्या तंत्रज्ञानाने चालणाऱ्या असून आपल्याकडचं सध्याचं तंत्रज्ञान यापूर्वीचं आहे. त्यामुळे, या दोन तंत्रज्ञानांचा मेळ घालणं आवश्यक आहे. ते गेल्या दीड वर्षांपासून न झाल्याने ५८० कोटी रुपयांची गुंतवणूक तशीच, अंगावर धूळ खात यार्डामध्ये प्रतीक्षेत आहे. बाहेर जुन्या मोनोरेलच्या बिघाडांत वाढ होते आहे. प्राधिकरणाकडे मोठा तांत्रिक अधिकारी-कर्मचारी वर्ग आहे. सल्लागारांची मोठी मांदियाळी आहे. तरीही तंत्रज्ञानाच्या वापरातला हा घोळ कसा काय होतो? आणि तब्बल दीड वर्षे तो निस्तरला जात नाही, हे आश्चर्यच म्हणावं लागेल. जगात ४३ देशांत लघुमार्गांवर मोनोरेल वापरली जाते. खुद्द मलेशियातही तिचा वापर फार नाही. आपल्याकडेही तिचा विस्तार होण्याची शक्यता नाही. अशा परिस्थितीत कर्जबाजारी महाराष्ट्र राज्य या सेवेच्या आधुनिकीकरणासाठी, नवीनीकरणासाठी काही शे कोटी गुंतवून बसते; पण वर्ष - वर्ष त्याचा वापरही होऊ शकत नाही, ही गोंधळाची परिस्थिती भूषणावह नाही. प्रशासकीय पातळीवरचा हा गोंधळ जितक्या लवकर संपवता येईल, तितकं राज्याचं हित होईल.मोनोरेलच्या धावत्या सेवेत अडथळे आल्याने त्याच्या मोठ्या बातम्या झाल्या. पण, मुंबई-ठाण्यात जिथे मेट्रोचं काम सुरू आहे, तिथे होणाऱ्या अपघातांची दखल गंभीरपणे घेतली जाते की नाही, हाही प्रश्नच आहे. मुंबई, ठाणे, भिवंडीतील अशा घटनांची यादीही बरीच मोठी आहे. रविवारी दुपारी घोडबंदर मार्गावर मेट्रोच्या सुरू असलेल्या कामावरून एक मोठा लोखंडी रॉड गाडीवर पडला आणि त्यामुळे गाडी चालकाला दुखापत झाली. भिवंडीत ५ ऑगस्ट रोजी रिक्षाने जाणाऱ्या प्रवाशाच्या डोक्यात लोखंडी रॉड घुसून मोठी दुखापत झाली. मेट्रोची ही कामं रहदारीच्या रस्त्यावर सुरू आहेत, हे मान्य. पण, ही वस्तुस्थिती आधीच लक्षात घेऊन त्यासाठी आवश्यक त्या सुरक्षा उपाययोजना आखायला नकोत का? एका बाजूला या प्राधिकरणाच्या प्रकल्पांच्या किमतीचे सुधारित आकडे आणि दुसऱ्या बाजूला हा निष्काळजीपणा-दोन्ही वाढतेच आहेत. सुजाण नागरिकांसाठी हे दोन्ही चिंतेचे विषय आहेत!

# शिवकालीन रणरागिणींच्या स्मृती जागवणारा प्रेरणादायी सोहळा

## रवींद्र मालुसरे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील रणरागिणींचा पराक्रम आणि स्त्रीशक्तीची परंपरा नव्या पिढीपुढे उभी करण्यासाठी श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने दादरच्या श्री शिवाजी मंदिर नाट्यमंदिरात वार्षिक सोहळा शेकडो विद्यार्थी, पालक आणि शिवप्रेमींच्या उपस्थितीने उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थित प्रेक्षकांना आनंद दिला.सुप्रसिद्ध इतिहास अभ्यासक-लेखक प्रवीण भोसले यांनी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, शिक्षणाचा उपयोग केवळ प्रमाणपत्रापुरता न राहता दैनंदिन आयुष्यात आणि आवडीच्या क्षेत्रात कर्तबगारी दाखवण्यासाठी करावा.वैयक्तिक आयुष्यात शिक्षणाची पात्रता सिद्ध करायला लागते. आज तुमचा शिक्षणाचा टप्पा पूर्ण झाला आहे, घेतलेल्या शिक्षणाचा रोजच्या व्यवहारात वापर कसा करणार आहात, हे जसे खरे आहे तसेच तुम्हाला इतर ज्या क्षेत्रात आवड आहे त्यात तुमचे अंगीकृत गुण दाखवत यशस्वी जीवनाला सामोरे जावे लागणार आहे. शिवरायांचे आठवावे रूप, आठवावा प्रताप - असे म्हणताना इतिहासाच्या पानांवर कोरलेल्या रणरागिणी डोळ्यासमोर येतात. मातोश्री जिजाबाई, महाराणी येसूबाई, ताराराणी, यलम्मा, पुण्यश्लोक अहिल्याबाई, विरांगणा रायबागन या स्त्रिया भावनांवर विजय मिळवत प्रत्येक आव्हानाला सामोरे जात होत्या. त्या स्वराज्यसेवक वीरांचा आधार होत्या आणि अप्रत्यक्षपणे स्वराज्यासाठी लढत होत्या. आजही स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत. तुम्हीही त्यांचा आदर्श घ्यावा.विशेष पाहुणे म्हणून उपस्थित एनएसजी कमांडो नरेश पवार यांनी आपल्या लष्करी अनुभवांची माहिती दिली. ते म्हणाले, पठाणकोट हल्ला, जम्मू-काश्मीरमधील कारवाया, पुंछ येथे बॉर्डरपार ऑपरेशन - सलग तीन वर्षे पाकिस्तानविरोधात कार्य करताना आम्ही अनेक संकटांना सामोरे गेलो. नुकतेच यशस्वी झालेले सिंदूर ऑपरेशन जाहीर करणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग या दोन धाडसी महिला होत्या. घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग सैन्यदलासाठीही करता येतो, प्राधान्याने देशसेवा करता येईल त्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

छत्रपती शिवाजी महाराजांचे सिद्धांत समाजकार्याचा पाया ठरावेत, या ध्येयाने कार्य करणाऱ्यांना दिला जाणारा सुभेदार वीर तानाजी मालुसरे सन्मान पुरस्कार २०२५ मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष आणि इतिहास अभ्यासक रवींद्र मालुसरे यांना प्रदान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले, स्वराज्य हे शहाजी राजे आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचे स्वप्न होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी




ते सत्यात उतरवले, संभाजी महाराजांनी त्याचा विस्तार केला. या यज्ञात असंख्य मावळ्यांनी प्राणांची आहुती दिली. त्यांच्या बलिदानामुळे महाराष्ट्र धर्म काय असतो हे जगाला कळाले. या इतिहासाचा विसर मराठी माणसाला पडता कामा नये. मालुसरे कुळात जन्म झाल्याने सुभेदारांचा इतिहास पुढे आणणे हे मी कर्तव्य समजतो आहे. संस्थेचे प्रमुख डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी संस्थेचे योगदान अधोरेखित केले. ते म्हणाले, बारावीनंतर मुलींनी स्वावलंबी व्हावे, ही संकल्पना घेऊन मी डॉ. गायकवाड इन्स्टिट्यूट सुरू केले. आज ते पॅरामेडिकल क्षेत्रात देशभरात महत्त्वाचे स्थान मिळवून आहे. होमगार्ड प्रमुख म्हणूनही काम केल्यामुळे त्या कठोर शिस्तीमुळे अनेक मुली माझ्यावर बापासारखा विश्वास ठेवतात. तसेच, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य देशातील विविध भाषांमध्ये पोहोचवण्यासाठी त्यांनी श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनलची स्थापना केली असल्याचेही त्यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज ते छत्रपती राजाराम महाराज या काळातील इतिहास मी ग्रंथरूपाने इंग्रजी-मराठीसह इतर भाषामध्ये प्रकाशित केला आहे. सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय शिवकालीन रणरागिणी निबंध स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात आले. डॉ. अनुज अविनाश केसरकर, मुंबई (प्रथम क्रमांक), प्रा. प्रशांत पुंडलिक शिरुडे, ठाणे (द्वितीय क्रमांक), सुमिता अभिषेक पवार, मुंबई (तृतीय क्रमांक ), स्नेहल गोविंद चव्हाण, रत्नागिरी आणि हिमांशू विजय शुक्ल, जळगाव (उत्तेजनार्थ ) यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाला मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे माजी अध्यक्ष विजय ना कदम, ज्येष्ठ पत्रकार राजन देसाई, ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक दिलीप दळवी, रामचंद्र जयस्वाल, राजेंद्र मालुसरे, जयवंत मालुसरे, संजय धामापूरकर, अजय नागवेकर उपस्थित होते. सोहळ्याचे सूत्रसंचालन मराठी साहित्य व कला सेवाचे संस्थापक अध्यक्ष गुरुदत्त वाकदेकर, युक्ता गोठणकर आणि आरती लोखंडे यांनी केले. आर्णा सुर्वे, साक्षी निर्मल, गौरव गायकवाड, समिक्षा बिळीगुदरी आणि साहिल धाकतोडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# चहा पिण्यापूर्वी पाणी प्यायल्याने खरोखरच सिडिटीची समस्या कमी होते का?

काही लोकांना चहा प्यायल्यानंतर सिडिटीचा त्रास होतो. अशा वेळी चहानंतर होणारी सिडिटी कमी करण्यासाठी कोणते उपाय करता येतील? याबद्दल तज्ज्ञांकडून जाणून घेऊ. आयुर्वेद आणि आरोग्य तज्ज्ञांच्या मते, रिकाम्या पोटी चहा पिण्याचा पचनसंस्था, सिडिटी आणि चयापचयावर वाईट परिणाम होतो. कारण चहामध्ये कॅफिन आणि टॅनिन हे घटक असतात, जे सिडिटी वाढवतात. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर चहा पिण्याची सवय असेल, तर त्यापूर्वी पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. शिवाय, चहा गरम असल्यास सिड पातळी वाढते, पण पाणी प्यायल्याने पोटातील सिड पातळी वाढत नाही.

आरएमएल हॉस्पिटलमधील मेडिसिन विभागातील डॉ. सुभाष गिरी सांगतात की, रिकाम्या पोटी चहा पिण्यापूर्वी एक ग्लास साधे पाणी प्यायल्यास पाणी शरीरातील सिड पातळ करू शकते. असे



केल्याने चहातील कॅफिनचा परिणाम कमी होतो. त्यामुळे पोटातील जळजळ कमी होऊ शकते. मात्र, पाणी प्यायल्याने सिडिटी पूर्णपणे दूर होईल, असे म्हणणे चुकीचे आहे. परंतु रिकाम्या पोटी चहामुळे होणारी सिडिटी बऱ्याच अंशी कमी होऊ शकते.

**रिकाम्या पोटी चहापूर्वी काय खावे किंवा प्यावे?**

-गॅस्ट्रोएंटेरोलॉजिस्ट्सच्या मते, ज्या लोकांना चहामुळे सिडिटी होते, त्यांनी रिकाम्या पोटी सर्वप्रथम पाणी प्यावे

-हवे तर कोमट पाणी प्यावे. यामुळे पोटाचे पीएच पातळी संतुलित राहते.

-रिकाम्या पोटी चहा पिण्यापूर्वी हलका नाश्ता किंवा एखादे फळ खाऊ शकता. शक्यतो नाश्त्यानंतरच चहा प्यावा.

-ज्यांना सिडिटीचा सर्वाधिक त्रास होतो, त्यांनी दूधाच्या चहाऐवजी हर्बल टी, ग्रीन टी किंवा ब्लॅक टी प्यावी

-शिवाय, शक्य असल्यास दूधाचा चहा दूधासोबत उकळू नये, तर ब्लॅक टी बनवून त्यात वरून गरम दूध मिसळून प्यावा

**फक्त पाणी पिणे पुरेसे आहे का?**

पाणी पिण्याने आराम मिळू शकतो. परंतु जर तुम्ही दिवसभर तेलकट, मसालेदार किंवा जंक फूड खात राहिलात, कॅफिन घेत राहिलात, तर सिडिटी पूर्णपणे दूर करणे कठीण आहे. त्यामुळे तुमच्या खाण्याच्या सवयींमध्ये बदल करा आणि जीवनशैली निरोगी ठेवण्यास सुरुवात करा

# हसण्याने खरंच आयुष्य वाढतं? लवकर म्हातारपणही येत नाही? विज्ञान काय म्हणतं


नेहमी हसत राहावं, त्यामुळे मन तर खुश राहतं शिवाय आरोग्यही सुधारत, आयुष्य वाढतं असं आपण अनेकदा ऐकलं असेल. पण खरंच असं आहे का? याचे काही पुरावे आहेत का? तर विज्ञान आणि आयुर्वेदाने हसण्याबद्दल सांगितलेलं सत्या जाणून घेऊयात.

आजच्या धावपळीच्या आणि धकाधकीच्या जीवनात लोक अनेकदा हसणे विसरतात, परंतु सत्य हे आहे की हास्य हे केवळ मूड सुधारण्याचे साधन नाही तर आरोग्यासाठी सर्वात सोपा आणि मोफत टॉनिक आहे. असं म्हणतात की हास्याद्वारे नैसर्गिक ताणतणाव दूर करते. पण विज्ञान आणि आयुर्वेद दोघेही मानतात की हास्य शरीर आणि मनाला रिचार्ज करते, तणावाची पातळी कमी करते आणि दीर्घायुष्याचे रहस्य दडलेले आहे.

हास्य ही केवळ भावना नाही तर आरोग्यासाठी एक टॉनिक आहे. विज्ञान आणि आयुर्वेद दोघेही मानतात की दररोज हसल्याने ताण कमी होतो, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि आयुर्मान वाढते.

**हसण्याच्या फायद्याबद्दल विज्ञान काय म्हणते?**

आधुनिक विज्ञान असे मानते की हास्य हे एखाद्या



नैसर्गिक औषधापेक्षा कमी नाही.

हसताना, मेंदूतून एंडोर्फिन आणि डोपामाइन बाहेर पडतात, जे त्वरित ताण कमी करतात. रक्ताभिसरण सुधारते आणि हृदय निरोगी राहते.

संशोधनानुसार, दररोज १०-१५ मिनिटे हसणे हे हलक्या व्यायामाइतकेच फायदेशीर आहे.

हसण्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते, स्मरणशक्ती चांगली राहते आणि मन ताजेतवाने राहते.

**हसण्याच्या फायद्याबद्दल आयुर्वेद काय म्हणते?**

आयुर्वेदात हास्याला एक नैसर्गिक औषध म्हटले आहे, जे शरीर आणि मनाचे संतुलन राखते.

हसण्यामुळे वात-पित्त-कफ यांचे संतुलन सुधारते.

पचनक्रिया सुधारते आणि झोपही चांगली येते.

आयुर्वेद मानतो की आनंदी राहणे आणि हसणे तुमचे आयुष्यमान थेट वाढवते

हेच कारण आहे की योग आणि ध्यानासोबतच हास्य हे दीर्घायुष्याचा एक महत्त्वाचा भाग मानले जाते.

**दररोज हसण्याची सवय कशी लावायची**

तुमची सकाळची सुरुवात हास्य योगाने करा.


कुटुंब आणि मित्रांसोबत वेळ घालवा आणि मोठ्याने हसा.

विनोदी कार्यक्रम पहा, मजेदार पुस्तके वाचा किंवा मुलांसोबत खेळा.

लहान आनंद आणि मोठ्याने हसणे केवळ निरोगी शरीर आणि मनच देत नाही तर तुमचे आयुष्य दीर्घ आणि आनंदी बनवते

# रेट्रो फोटोनंतर आता नव्या ट्रेंडची तुफान चर्चा, लहानपणाचं आगळंवेगळं रुप येणार समोर!!

सध्या सोशल मीडियावर एआय टूलच्या माध्यमातून तयार केले जाणारे रेट्रो फोटो सगळीकडेच चर्चेचा विषय ठरले आहेत. प्रत्येकाच्या सोशल मीडिया खात्यावर हे फोटो दिसून येत आहेत. गुगल जेमिनीच्या नॅनॉ बनाना (Nano Banana) फिचरमुळे फोटोंच्या नव्या ट्रेंडला सुरुवात झाली आहे. नॅनो बनाना हे फिचर जेमिनी ॲपमध्ये अपलब्ध आहे. या ॲपच्या माध्यमातून तुम्हाला स्वत:चे थ्रिडी फोटो तयार करता येतात. त्यानंतर जेमिनीवर रेट्रो फोटोंचा ड्रेंड आला. यामध्ये महिला लाल, काळ्या, निळ्या रंगाच्या साड्यांमध्ये दिसत आहेत. महिलांच्या या एआय फोटोंनी तर सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. दरम्यान आता याच गुगल जेमिनीवर हग माय यंगर सेल्फ (Hug my younger self) हा नवा ट्रेंड आला आहे. या नव्या ट्रेंडमध्ये एखाद्या व्यक्तीला स्वत:च्याच लहाणपणीच्या फोटोसोबत दाखवता येते. लहानपणाचा फोटो आणि स्वत:चा मोठे झाल्यानंतरचा फोटो एकाच फ्रेममध्ये पाहायला मिळत असल्यामुळे हा नवा ट्रेंड आता चर्चेचा विषय ठरला आहे. व्हायरल झालेल्या या ट्रेंडप्रमाणे फोटो कसे तयार करायचे, हे समजून घेऊ या. सर्वात अगोदर तुम्हाला गुगल जेमिनी ॲप डाऊनलोड करावे लागले. त्यानंतर




तुमच्या जीमेल खात्याच्या मदतीने लॉगिन करावे लागेल. लॉगिन केल्यानंतर तुम्हाला एकूण दोन इमेजेस निवडायच्या आहेत. यातील एक इमेज ही तुमची चालू वयातील असेल तर दुसरी लहाणपणीची इमेज असली पाहिजे. त्यानंतर click a cute polaroid picture of my older self hugging my younger self. असा प्रॉम्ट द्यावा लागेल. त्यानंतर जेमिनीला इमेज तयार करण्याची कमांड द्यावी लागेल आणि काही सेकंद वाट पाहावी लागेल. पुढच्याच काही सेकंदांत तुम्हाला तुमची hug my younger self या ट्रेंडमध्ये सामील होण्यासाठी इमेज मिळून जाईल. दरम्यान, रेट्रो फोडो, थ्रीडी मॉडेल फोटोंमुळे गुगल जेमिनी जगभरात लोकप्रिय झाले आहे. जेमिनीने चॅट जिपीटीलाही मागे टाकले असल्याचे बोलले जात आहे.

## शासनाच्या चुकीच्या निर्णयाविरोधात अंबाजोगाईत आयएमएचे तीव्र आंदोलन

# शासनाचे परिपत्रक कायदा विरोधी व न्यायालयाचा अवमान करणारे–सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.इंगोले

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**–महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण आणि औषध द्रव्ये विभागाने ५ सप्टेंबर २०२५ रोजी परिपत्रक जारी करून सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांची नोंदणी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (एमएमसी) च्या स्वतंत्र रजिस्टरमध्ये करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, या निर्णयाचा भारतीय वैद्यकीय संघटना (आयएमए) महाराष्ट्र राज्याने तीव्र विरोध दर्शविला असून गुरूवार, दिनांक १८ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय संप पुकारण्यात आला होता. या संपामुळे अंबाजोगाईसह संपूर्ण महाराष्ट्रात रूग्णसेवा विस्कळीत झाली होती.

यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई तर्फे आयएमएचे सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, डॉ.नवनाथ घुगे, डॉ.विजय लाड, डॉ.उद्धव शिंदे, डॉ.एस.यु.पाटील, डॉ.दिलीप खेडगीकर, डॉ.राहुल धाकडेंसह मार्ड संघटनेचे डॉ.निखिल सातपुते, इनर व्हिल क्लबचे प्रा.सुरेखा सिरसाट, प्रा.चंद्रकला देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संघटनेची भूमिका मांडताना डॉ.राजेश इंगोले यांनी स्पष्ट केले की, बीएचएस डॉक्टर्स आधीच महाराष्ट्र होमिओपॅथिक कौन्सिलमध्ये नोंदणीकृत




आहेत. शासनाने घेतलेला हा निर्णय ११ जुलै २०२४ रोजीच्या स्वतःच्या परिपत्रकाच्या विरोधात असून, यासंदर्भातील खटला माननीय मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असताना काढलेले हे परिपत्रक कायद्याला धरून नसलेले व न्यायालयाचा अवमान करणारे आहे. होमिओपॅथी आपल्या जागी श्रेष्ठ आहे. परंतु, त्या डॉक्टर्सनि आमची नांवनोंदणी ऍलोपॅथीच्या नोंदणी पुस्तकात करावी ही मागणी अनाकलनीय आहे. होमिओपॅथीचा अभ्यासक्रम पूर्णपणे वेगळा असून त्या पॅथीचे तत्व, उपचार पद्धती संपूर्ण वेगळ्या आहेत. होमिओपॅथी ऍलोपॅथी मध्ये मिक्स करण्याचं सरकारी मिक्स पॅथीचे धोरण हे सर्वसामान्य जनतेच्या प्राणाशी खेळण्याचा प्रयत्न आहे. या निर्णयामुळे रूग्णांच्या सुरक्षिततेवर गंभीर धोका निर्माण होईल, आधुनिक वैद्यकीय शिक्षणाचा तसेच व्यवसायाचा दर्जा घसरेल. तसेच राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (एनएमसी) आणि महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कायद्याचे उल्लंघन होईल, अशी भूमिका डॉ राजेश इंगोले यांनी यावेळी मांडली. तर अपुरे प्रशिक्षण घेतलेले डॉक्टरांकडून रूग्णांवर उपचार म्हणजे थेट त्यांच्या जीवाशी खेळ असल्याची भीतीही डॉ.नवनाथ घुगे यांच्याकडून व्यक्त करण्यात आली आहे. तर यासंदर्भात गुरुवारी १८ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यभरातील सर्व डॉक्टर एक दिवसाचा संप केला ज्यामध्ये आपत्कालीन सेवाही पूर्णपणे बंद होत्या अशी माहिती आय.एम.ए महाराष्ट्र यांनी दिली आहे. तसेच शासनाने हा निर्णय मागे घेतला नाही तर पुढील आठवड्यात मुंबईतील आझाद मैदानावर भव्य मोर्चा आणि बेमुदत उपोषण छेडण्याचा इशाराही आयएमएने दिला आहे.

यावेळी या सरकारी निर्णयाचा निषेध करणारे निवेदन माननीय उपजिल्हाधिकारी यांना आयएमएच्या पदाधिकाऱ्यांनी दिले. या निषेध मोर्चात राज्य पदाधिकारी डॉ.राजेश इंगोले स्थानिक अध्यक्ष डॉ नवनाथ घुगे, उपाध्यक्ष डॉ.विजय लाड, डॉ.उद्धव शिंदे, डॉ.सोपानराव पाटील, डॉ दिलीप खेडगीकर, डॉ.निलेश तोष्णीवाल, डॉ.राहुल धाकडे, डॉ.दीपक पाटील, डॉ.संदीप थोरात, डॉ.अनिल भुतडा, डॉ.अतुल शिंदे, मार्ड संघटनेचे अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ.निखिल सातपुते, उपाध्यक्ष डॉ.संतोष चांदणे, सचिव डॉ.आशुतोष बावचे, प्रवक्त्या डॉ.स्नेहा निकम, महिला प्रतिनिधी डॉ.आयुष साबू, इनरहिल क्लबच्या सुरेखा शिरसाट, प्रा.चंद्रकला देशमुख यांच्यासह अनेक डॉक्टर्स उपस्थित होते. यावेळी सर्व डॉक्टर्संनी दिलेल्या घोषणांमुळे परिसर दुमदुमला होता.

---

## पनवेल कृषि उत्पन्न बाजार समितीला कोकण विभागातुन

# प्रथम क्रमांकाचा माजी मुख्यमंत्री पद्मभूषण सहकार महर्षी स्वर्गीय वसंतदादा पाटील स्मृती पुरस्कार प्रदान

**पनवेल** । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, पुणे यांच्या ५६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत राज्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बाजार समित्यांना माजी मुख्यमंत्री पद्मभूषण स्वर्गीय वसंतदादा पाटील स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात कोकण विभागातून रायगड जिल्ह्यातील पनवेल कृषि उत्पन्न बाजार समितीने उत्कृष्ट कामगिरीचा मान पटकावत प्रथम क्रमांकाचा पद्मभूषण स्वर्गीय वसंतदादा पाटील स्मृती पुरस्कार मिळवून आपल्या कार्याचा राज्यभर ठसा उमटविला. उत्कृष्ट कामगिरी, पारदर्शक कारभार आणि शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारी योजना यांचा सखोल आढावा घेऊन हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती श्री.प्रविणकुमार नाहाटा, उपसभापती श्री.संतोष सुर्यवंशी, विधानपरिषद माजी आमदार संचालक



मानकर साहेब, संचालक डव्होकेट श्री.सुधीर कोठारी, तसेच महिला संचालिका यांच्या शुभहस्ते हा सन्मान पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीला प्रदान करण्यात आला.यावेळी माजी आमदार दत्तुशेठ पाटील पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री.नारायणशेठ घरत, समितीचे उपसभापती श्री.सुनील सोनावळे, संचालक श्री.अशोक गायकर , श्री.देवेंद्र पाटील, श्री.सुभाष पाटील, श्री.देवेंद्र मढवी, श्री.बाळकृष्ण पाटील ,श्री.महादू पाटील ,श्री मच्छिंद्र पाटील, श्री.रामचंद्र पाटील, श्री.अर्जुन गायकर, श्री.सखाराम पाटील, श्री.प्रताप हातमोडे ,श्री.दिनेश महाडिक ,श्री.सोमनाथ म्हात्रे ,श्री.अतिष पाटील, सौ.ललिता गोपीनाथ फडके यांच्यासह सचिव श्री.प्रकाश नाईक ,निरीक्षक श्री विजय गायकवाड, वाहनचालक राम भगत उपस्थित होते.माजी आमदार श्री.विवेक पाटील साहेब, माजी आमदार श्री.बाळाराम पाटील साहेब, पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती श्री.काशीनाथ पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल बाजार समितीने मागील काही वर्षांत शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळावा, शेतकऱ्यांना त्वरित देयकांची हमी, स्वच्छ आणि सुव्यवस्थित बाजार परिसर अशा अनेक उपक्रमांद्वारे आदर्श कामगिरी बजावली आहे. याच पार्श्वभूमीवर कोकण विभागातील बाजार समित्यांमध्ये समितीने आपले वेगळेपण सिद्ध करून प्रथम क्रमांकाचा हा मानाचा बहुमान मिळवला.या यशाबद्दल सभापती, उपसभापती, सर्व संचालक मंडळ, सचिव, कर्मचारी, व्यापारी वर्ग आणि शेतकरी बांधवांचे आभार मानत पुढील काळात शेतकऱ्यांच्या हितासाठी अधिक उपयुक्त व नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचा निर्धार व्यक्त केला.हा पुरस्कार पनवेल बाजार समितीच्या कार्यक्षम नेतृत्वाची आणि शेतकरी कल्याणासाठीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची राज्यस्तरावर दखल घेणारा ठरला आहे.

---

# वशेणी गावात दारूबंदी व हळदीला साडी घेण्याच्या प्रथेविरोधात जनजागृती रॅली



**उरण । प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील वशेणी गावात वाढत्या सामाजिक समस्या आणि अनावश्यक प्रथा थांबविण्यासाठी वशेणी गावात भव्य जनजागृती रॅली काढण्यात आली. दारूबंदी तसेच हळदीला साडी घेण्याची प्रथा बंद करण्यासाठी ही रॅली आयोजित करण्यात आली होती.रॅलीत ग्रामस्थ, महिला मंडळ, युवक मंडळ तसेच शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दारूबंदी करा – समाज वाचवा, अनाठायी प्रथा बंद करा – समाजाला नवा दिशा द्या अशा घोषणा देत रॅलीतून जनतेला संदेश देण्यात आला.

गावातील प्रमुख नागरिक व कार्यकर्त्यांनी भाषणातून दारूचे दुष्परिणाम व अनावश्यक प्रथा थांबवल्यास होणारे फायदे याबाबत मार्गदर्शन केले. गाव एकसंघ होऊन ही जनजागृती राबवल्यास समाजात सकारात्मक बदल घडेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.दारूबंदी साठी गावातील पोलीस पाटील व तालुका पोलीस अधिकारी सहकार्य करत असून येत्या काही दिवसात कडक कारवाई करण्यात येईल असे त्यांनी आश्वासीत केले आहे.या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, रॅलीमुळे गावात सामाजिक जागरूकतेची नवी ऊर्जा निर्माण झाल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.यावेळी ग्रामपंचायत सरपंच अनामिका म्हात्रे व सर्व ग्रामपंचायत सहकारी सदस्य उपस्थित होते.

---

## राज्याला १२ लाख मेट्रिक टन पुरवठ्याची कृषिमंत्री भरणे यांची केंद्राकडे मागणी

**मुंबई (वृत्तसंस्था)**–रब्बी हंगामात शेतकऱ्यांना युरियाचा तुटवडा भासू नये म्हणून महाराष्ट्राचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केंद्र सरकारकडे तातडीने अतिरिक्त पुरवठ्याची मागणी केली आहे. सध्या राज्यातील युरियाचा साठा केवळ २.३६ लाख मेट्रिक टन इतकाच असून, खरीपातील वाढलेल्या पेरणीमुळे आणि मक्याच्या क्षेत्रात झालेल्या तब्बल ५४ टक्के वाढीमुळे खताची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यासाठी १२ लाख मेट्रिक टन युरियाच्या प्रस्तावाला मंजुरी देण्याची विनंती भरणे यांनी रसायन व खत मंत्री जे.पी. नड्डा यांना पत्राद्वारे केली आहे.राज्याला एप्रिल ते जुलै या कालावधीत केंद्राकडून १०.६७ लाख मेट्रिक टन युरियाचे वाटप होणे अपेक्षित होतं, मात्र, एकूण युरिया खतापैकी फक्त ७८% म्हणजे ८.४१ लाख मेट्रिक टन युरियाचा पुरवठा करण्यात



आला. त्यातच ऑगस्ट महिन्यात २.७९ लाख मेट्रिक टन वाटपातील केवळ ०.९६ लाख मेट्रिक टन पुरवठा मिळाला आहे.राज्यात खरीप हंगामातील पेरणी ९८ टक्के पूर्ण झाली असून, एकूण पेरणी क्षेत्र १४४ लाख हेक्टर आहे. विशेष म्हणजे, यंदा १४.३० लाख हेक्टरवर मक्याची पेरणी झाली असून मका पेरणी तब्बल ५४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे कापूस, मका आणि इतर पिकांसाठी टॉप ड्रेसिंग डोसची मागणी वाढली आहे.

---

# पारनेर सुपा रोड मुत्युंचा सापळा बनला असताना गप्प का?–मनसे नेते अविनाश पवार

**पारनेर । प्रतिनिधी**

सुपा रोडवर आमदारांसह , खासदार दिवसांत चार वेळा प्रवास करताना दिसतात पण रस्त्याच्या दुरुस्तीसाठी दोघेही ब्र शब्द काढायला तयार नाहीत हे पारनेर तालुक्यातील जनतेच दुर्दैवच म्हणावे लागेल पारनेर तालुक्यात प्रशासकिय अधिकारी मनमानी पद्धतीने काम करत आहेत हे यातुन स्पष्ट होते आहे पारनेर– सुपा रोडवर सुपा एम. आय. डी.सी. मुळे कामरांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते तसेच पारनेर तालुक्याच ठिकाण असल्याने शाळा, कॉलेजसह तहसील कचेरी मुळं रस्त्यावर मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक चालत आहे आणि रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे रस्त्यावर अपघात होतात अपंगत्व प्राप्त होऊन कुटुंब उद्ध्वस्त होत असताना ज्यांना जनतेनी निवडणूक दिलं ते काहीही बोलायला तयार नाही विशेष बाब म्हणजे खासदार पण पारनेर मधील आणि आमदार पण पारनेर मधील आणि रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे रस्त्यावर प्रवासी अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत त्यामुळे दोन दिवसांत जर रस्त्यावरील खड्डे बुजवीले नाही तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पारनेर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात मनसे स्टाईल आंदोलन करण्यात येणार असल्याचे पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.




---

# हैदराबाद गॅझेटविरोधातील जनहित याचिका हायकोर्टाने फेटाळली, याचिकाकर्त्याला फटकारले

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट संदर्भात काढलेल्या अध्यादेशाला आव्हान देणारी याचिका हायकोर्टात दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी पार पडली असून, कोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे. वकील विनीत धोत्रे यांनी ही याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्याने जनहित याचिका दाखल केली आहे. पण या याचिकेतील मुद्दे आणि मागणी पाहता व्यापक जनहित दिसत नाही. त्यांना जीआरवर आक्षेप असेल त्यांनी स्वत:ची वैयक्तिक रिट याचिका दाखल करावी, असे म्हणत मुंबई हायकोर्टाने ही याचिका फेटाळली.राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेल्या हैदराबाद गॅझेटच्या अध्यादेशामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. मात्र, यामुळे ओबीसी आरक्षणावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे अध्यादेशावर आक्षेप घेत दोन जनहित याचिका मुंबई हायकोर्टात दाखल करण्यात आल्या आहेत. त्यापैकी वकील विनीत धोत्रे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. हायकोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे. हा मराठा समाजासाठी मोठा दिलासा समजला जात आहे.

मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. आजची सुनावणी ही दोन सत्रांमध्ये झाली. सकाळच्या सत्रातील सुनावणीच्या सुरुवातीलाच ही याचिका जनहित याचिकेच्या कक्षेत बसते का? असा सवाल कोर्टाने केला. तर दुपारच्या सत्रात सुनावणीत सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली.कोर्टाने म्हटले की, या जनहित याचिकेत 'व्यापक जनहित' दिसत नाही. तसेच, 'ज्या व्यक्तींना सरकारी निर्णयामुळे थेट बाधा झाली आहे, अशांनीच याचिका दाखल करणे अपेक्षित आहे.' याचिकेत कायद्यानुसार 'दुर्भावना' (malice in law) दिसून येत असली, तरी ती केवळ बाधित व्यक्तीच मांडू शकते, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली. शासन निर्णयाने कुठल्याही समाजातील लोकांचे नुकसान झालेले नाही. इतर कोणत्याही जातीच्या आरक्षणावर त्याचा परिणाम झालेला नाही, असे सांगितले.त्यानंतर हायकोर्टाने याचिकाकर्त्यांना महत्त्वाचा सवाल केला. या जीआरमुळे याचिकाकर्ते बाधित कसे? असा प्रश्न हायकोर्टाने विचारला. तसेच अशा याचिका दाखल होणे उच्च न्यायालयाला अपेक्षित नाही. आम्ही या याचिकेवर कोणताही विचार करण्यास इच्छुक नाही आणि त्यामुळे ती फेटाळली जात आहे,असे कोर्टाने सांगितले. मात्र, त्याचवेळी, याचिकाकर्त्याला इतर बाधित व्यक्तींनी दाखल केलेल्या याचिकांमध्ये हस्तक्षेप करण्याची मुभाही देण्यात आली आहे. जीआरवर आक्षेप असेल त्यांनी स्वत:ची वैयक्तिक रिट याचिका दाखल करावी, असे कोर्टाने म्हटले आहे.



# ओबीसी आरक्षण रक्षक प्रा.लक्ष्मण हाके यांचा शासनावर जोरदार प्रहार

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील पंचायत समितीच्या विशाल मैदानावर ओबीसी आरक्षण बचाव मोर्चा सभा पार पडली.प्रा. लक्ष्मण हाके यांनी यावेळी आपल्या भाषणात सांगितले की, ज्या निजामांना आम्ही हाकलून दिले त्यांच्याच पुराव्यांवर आज ओबीसी समाजाचे आरक्षण संपवण्याचा कट रचला जात आहे. आणि ओबीसींची झोपडी जर उध्वस्त होत असेल तर आता आम्ही गप्प बसणार नाही असा एल्गार ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांनी पुकारला.ते केज येथे आयोजित ओबीसी आरक्षणबचाव विराट मेळाव्यामध्ये बोलत होते.केज तालुका सकल ओबीसी समाजाच्या वतीने दिनांक १९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ओबीसी आरक्षण बचाव मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके,नवनाथ वाघमारे तसेच बळीराम खटके यांची या मोर्चाला प्रमुख उपस्थिती होती.केज शहरातील जय भवानी चौकातून मुख्य रस्त्याने सदरील मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौकात येऊन धडकला. या मोर्चामध्ये केज तालुक्यातीलच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातील हजारोंच्या संख्येने ओबीसी समाज एकवटला होता. छत्रपती शिवाजी महाराज चौकात निवेदन दिल्यानंतर सदरील मोर्चाचे रूपांतर जाहीर सभेमध्ये झाले. यावेळी प्रा.लक्ष्मण हाके यांनी जोरदार भाषण करत चारी बाजूने फटकारे मारले.पुढे बोलताना प्रा.लक्ष्मण हाके यांनी सांगितले की,ज्या निजामांना आपणच हाकलून दिले अशा निजामाच्या






नोंदी वर ओबीसींचे आरक्षण धोक्यात आणले जात असल्याचा कट रचल्या जात आहे.एवढेच नव्हे तर गाव गाड्यामध्ये राहणाऱ्या ओबीसी समाजाला प्रवाहाच्या बाहेर फेकण्याचे काम होत असून ओबीसी प्रवर्गातील सुमारे साडे तीनशे जातींवर राज्यकर्ते आणि कांही घटक मोठ्या प्रमाणावर अन्याय करत आहेत. तसेच गाव गाड्यामध्ये राहणाऱ्या ओबीसी समाजाची झोपडी कुणी उध्वस्तकरण्याचा प्रयत्न कसा करत असेल तर आता आम्ही गप्प बसणार नाही. ज्याला जी भाषा समजते त्याच भाषेमध्ये आम्ही आता उत्तर देण्यासाठी सज्ज असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.ज्या ओबीसी समाजाच्या मतावर आपण निवडून येता त्याच ओबीसी समाजाला संकटामध्ये टाकण्याचे काम जिल्ह्यातील कित्येक राजकारणी करत आहेत.त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीमध्ये आम्ही ओबीसी मतदार काय करू शकतो हे दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही.तर मागच्या कित्येक वर्षांपासून ओबीसी समाजावर अन्याय होत असून ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना प्रवाहात आणण्यासाठी महाज्योती सारखी योजना आणण्यात आली.परंतु त्या महाज्योतीला कधीच पुरेसा निधी दिला नसल्याने आजही कित्येक ओबीसी समाजातील विद्यार्थी आपल्या न्याय हक्का पासून वंचित आहेत. जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील काही ठराविक नेते ओबीसी समाजामध्येच जाती -जातीमध्ये भांडण लावण्याचे काम करत असून ओबीसी समाजाने जात म्हणून न पाहता वर्ग म्हणून पहावे व या जुलमी जीआरला विरोध करण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहनही त्यांनी केले.मागच्या दोन वर्षांपासून आम्ही गप्प होतो मात्र विशिष्ट समाजाच्या दबावा खाली येऊन दि.२ सप्टेंबरला जो जीआर सरकारने काढला तो ओबीसीचे आरक्षण संपवण्याचा कट आहे. त्यामुळे दोन सप्टेंबर चा जीआर तात्काळ रद्द करावा अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. तसेच लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी जिल्ह्यातील कित्येकांना आमदार खासदार केले परंतु ते बेईमान झाले असा प्रहारही केला. मात्र आता ओबीसी समाज जागा झाला असून येणाऱ्या निवडणुकीमध्ये कोणाला खुर्चीवर बसवायचे हे ठरवणार असून ओबीसी समाजाला गृहीत धरण्याची चूक आता करू नका असा गर्भित इशाराही दिला.दरम्यान यावेळी नवनाथ वाघमारे,बळीराम खटके यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना ओबीसी आरक्षणाला धक्का लागत आहे म्हणून आम्ही आता रस्त्यावरची आरपारची लढाई लढण्यास सज्ज आहोत असा इशारा यावेळी दिला.सदरील मोर्चामध्ये अठरा पगड जातीचे ओबीसी हजारोच्या संख्येने एकवटल्याने मोर्चामध्ये भगवे आणि निळे वादळ दिसून येत होते. यावेळी एकच पर्व ओबीसी सर्व अशा घोषणा दिल्या जात होत्या.

## केज शहरातील राजर्षी शाहु विद्यामंदिर येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित,राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला प्रथम स्वामी रामानंद तिर्थ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला व मराठवाडा मुक्ती संग्रामातील ज्ञात अज्ञात वीरांना अभिवादन करण्यात आले. ध्वजारोहणाचा मान माजी सैनिक श्री.व्यंकटराव ज्ञानोबा देशमुख वरपगावकर यांना देण्यात आला. याप्रसंगी शाळेच्यावतीने त्यांचा आदर सत्कार करण्यात आला. ध्वजारोहणासाठी संस्थेचे सचिव श्री.गदळे जी.बी,सामाजिक कार्यकर्ते श्री.हनुमंत भोसले,शाळेच्या



मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक श्री.डापकर एस.ए व श्री.चौधरी बी.डी तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद,विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## अली अल्लाना कॉलेज ऑफ फार्मसी, अक्कलकुवा येथे ‘ट्रायबल कम्युनिटी डेव्हलपमेंट’ कार्यक्रम

**मोलगी । रविंद्र वळवी**

जामिया इस्लामिया इशाउतुल उलुम संचलित अली अल्लना औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयात ट्रायबल कम्युनिटी डेव्हलपमेंट कार्यक्रम मोठया उत्साहात पार पडला.

हा कार्यक्रम कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या सहकार्याने तसेच भारत सरकारच्या प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान (झच-णडक-) अंतर्गत आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष मौलाना हुजेफा वस्तानवी हे होते तर प्रमुख वक्ते म्हणुन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे संचालक प्रा. एस. के. पवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सिनेट सदस्य प्रा. दिनेश खरात आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचा उद्देश उच्च शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापुर्ण सुधार, संशोधन प्रोत्साहन आणि विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध करु न देणे हा आहे. उदघाट्न प्रसंगी डॉ. दिनेश खरात यांनी आदिवासी संस्कृतीचे संवर्धन करण्याची गरज अधोरेखित केली व विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील मार्ग निश्चित करण्यासाठी प्रेरित केले. प्राचार्य डॉ. गुलाम जावेद खान यांनी स्वागतपर भाषणात जामियाच्या ४५ वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला आणि संस्थापक अध्यक्ष मौलाना गुलाम वस्तानवी साहेब यांच्या समाजासाठी शिक्षण, पिण्याचे पाणी, आरोग्यसेवा, रोजगार, उद्योजकता व सरकारी सेवा उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांची माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष मौलाना हुजैफा वस्तानवी यांनी मानवता आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी तरुणांना मोबाईल व्यसनापासून सावध राहण्याचे आवाहन करत विद्यार्थी हे समाजाचे मुख्य स्तंभ असल्याचे नमूद केले.मुख्य व्याख्याते प्रा. एस. के. पवार यांनी आदिवासी क्षेत्रातील नामांकित व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा उल्लेख करुन विद्यार्थ्यांना त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. दुपारच्या सत्रात प्रो. एजाज अहमद, औषध निर्माण अधिकारी जुबैर शेख यांनी ही मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फार्माकोग्नोसीचे विभाग प्रमुख प्रा. मज्जाज काझी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जामियाचे व्यवस्थापन, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

## ग्राम विकासासाठी ’मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान’ राबविणार–आमदार राजेश पाडवी

**बोरद । मंगेश पाटील**

शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पारदर्शकपणे पोहोचवण्यासाठी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' राबवले जाणार आहे. या अभियानात जनतेचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, सर्वांनी एकत्र येऊन गावाचा विकास साधावा, असे आवाहन आमदार राजेश पाडवी यांनी केले. सोमवल येथे सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने आयोजित भाजपच्या मंडळ कार्यशाळेत ते बोलत होते.

या कार्यशाळेत तालुक्यातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, बुथ कमिटी अध्यक्ष




तसेच केंद्र व तालुका कमिटीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्यात १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत हे अभियान राबवले जाणार आहे.यावेळी आमदार राजेश पाडवी यांनी अभियानाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, एकही पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू नये यासाठी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत प्रशासन पूर्ण प्रयत्न करेल. त्यांनी आदर्श ग्रामपंचायत कशी असावी, गावाचा विकास कसा साधावा, अभियानाचे निकष आणि शासनाकडून मिळणाऱ्या बक्षिसांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तळोदा शहादा मतदार संघाचे निवडणूक प्रभारी प्राध्यापक विलास डाबरे यांनी केले, तर प्रास्ताविक तालुकाध्यक्ष दरबार सिंग पाडवी यांनी केले. कार्यक्रमाला नंदुरबार जिल्ह्याचे महामंत्री कैलास चौधरी आणि बळीराम पाडवी यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी तालुक्यातून सर्व सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, माजी नगरसेवक, तालुका कमिटीचे सदस्य आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## आदिवासी आरक्षणात घुसखोरीला आमदार राजेश पाडवींचा विरोध

**बोरद । मंगेश पाटील**

आदिवासी समाजाच्या आरक्षणाचे संवैधानिक हक्क अबाधित राखण्यासाठी शहादा-तळोदा मतदारसंघाचे आमदार राजेश पाडवी यांनी मुख्यमंत्री, राज्यपाल आणि आदिवासी विकास मंत्र्यांना निवेदन दिले आहे. सध्या राज्यात हैदराबाद गॅझेटच्या संदर्भाचा आधार घेत काही समाज घटक आणि राजकीय नेते अनुसूचित जमातीच्या (डढ) आरक्षणात इतर समाजालाही सहभागी करून घेण्याची मागणी करत आहेत, ज्याला आमदार पाडवी यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे.

आमदार पाडवी यांनी निवेदनात म्हटले आहे की, आदिवासी समाजासाठी असलेले आरक्षण हे संविधानाने दिलेले अधिकार आहेत. शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी हे आरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. इतर कोणत्याही समाजाचा यात समावेश करणे म्हणजे आदिवासींच्या हक्कांवर गदा आणण्यासारखे आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. जर शासनाने अशा प्रकारचा कोणताही निर्णय घेतला किंवा तसे आश्वासन दिले, तर एक आदिवासी आमदार या नात्याने आपण या निर्णयाला ठाम विरोध नोंदवू. तसेच, आदिवासी समाजासह मोठे जनआंदोलन उभारण्यास आपण बाध्य होऊ, असा इशाराही त्यांनी दिला आहे. आमदार राजेश पाडवी यांनी प्रशासनाकडे केलेल्या या मागणीमुळे आदिवासी समाजाचे आरक्षण सुरक्षित ठेवण्यासाठी पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## औसा शहरातील दिव्यांग बांधवांना न.प.मार्फत निधी वाटप




**औसा । प्रतिनिधि**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून औसा नगरपालिकेतर्फे शहरातील दिव्यांग बांधवांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला. नगरपरिषदेमार्फत एकूण १९५ दिव्यांग बांधवांना १,९५००० रुपयांचा निधी धनादेशांच्या स्वरूपात वितरित करण्यात आला. नगरपालिकेचे मुख्याधिकारी मंगेश चव्हाण यांच्या हस्ते या धनादेशांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास लातूर जिल्हा दिव्यांग संघटनेचे उपाध्यक्ष मिनाज शेख, तालुकाध्यक्ष जुल्फेखार इनामदार, सचिव हरिभाऊ कुलकर्णी, तसेच औसा शहराध्यक्ष अशोक देशमाने यांची प्रमुख उपस्थिती होती. नगरपालिका सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला दिव्यांग बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर मिळालेला हा निधी त्यांच्यासाठी दिलासा ठरला असून दिव्यांग बांधवांनी औसा नगरपालिकेचे तसेच उपस्थित मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानले. या प्रसंगी बोलताना मान्यवरांनी दिव्यांग बांधवांच्या सामाजिक सक्षमीकरणासाठी नगरपरिषद नेहमीच कटिबद्ध असल्याचे सांगितले. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे स्मरण करून हा उपक्रम दिव्यांग बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा ठरला. औसा शहरात दिव्यांग बांधवांसाठी यापुढेही अशा प्रकारचे कल्याणकारी उपक्रम राबविले जातील, असे आश्वासनही यावेळी देण्यात आले.

## वनोजादेवी परिसरातील ३३ के.व्ही.उपकेंद्र उभारणीसाठी शिवसेनेच्या (शिंदे) वतीने उपअभियंता मारेगाव यांना निवेदन

**मारेगाव । प्रतिनिधि**

मारेगाव तालुक्यातील वनोजादेवी परिसरातील ३३ के.व्ही. उपकेंद्र उभारणी संदर्भातील दीर्घकाळाच्या प्रतीक्षेनंतर शिवसेनेच्या (शिंदे गट) वतीने उपअभियंता मारेगाव यांना निवेदन देण्यात आले. सन २०२२/२३ पासून या उपकेंद्राच्या उभारणीची घोषणा झाल्यामुळे शेतकरी, विद्यार्थी आणि परिसरातील सर्वसामान्य जनतेत मोठी आशा निर्माण झाली होती.

उपकेंद्रासाठी निश्चित केलेल्या जागेच्या संदर्भात शेतकऱ्यांनी शेतमजिनी हस्तांतरणासाठी २०२३/२४ मध्ये कागदपत्रे दिली होती, मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही वीज वितरण कंपनीकडून करण्यात आलेली नाही. निवेदनात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी याबाबत तातडीने कारवाई करावी, अन्यथा आंदोलन करण्याची खबरदारी देण्यात आली आहे.परिसरातील नागरिक, शेतकरी आणि व्यावसायिक अनेक वर्षांपासून विजेच्या अनियमित पुरवठ्यामुळे त्रस्त आहेत. सतत ढासळलेल्या वीज पुरवठ्यामुळे शेतीतील उत्पादनावर व व्यवसायिक कामकाजावर परिणाम होत



आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही याचा गंभीर परिणाम होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

निवेदन मालेगाव तालुका प्रमुख विशाल कीन्हेकर यांच्या नेतृत्वाखाली, तालुका संघटक प्रविण बल्की, उपतालुकाप्रमुख प्रशांतकुमार भंडारी, शहर प्रमुख विजय मेश्राम, राजु खडसे, गजू भोयर, अमित देवतळे, गणेश धोबे, संजय बलकी, सुधाकर डावे, प्रविण काळे, पंडित काळे, रूदा सातपुते, महादेव मस्की, रफिक शेख, भानुदास डावे, राजू बलकी, तुळशीराम गोरे, राजू देवतळे, महादेव मडावी, नाना मस्की, शोभा भंडारी यांच्यासह शिवसैनिक आणि लाखापुर, डोल व वनोजा येथील नागरिक उपस्थित होते.विज वितरण कंपनीकडून वेळेवर उपकेंद्र उभारणी केली गेली नाही तर तालुका शिवसेनेच्या (शिंदे) वतीने तीव्र आंदोलन करण्याची भूमिका राखली गेली आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077